# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

## बातमी क्र.०१

जळगाव दि.२१ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील योग मार्गदर्शन केंद्राच्या वतीने मंगळवार दि.२१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्यासह ५०० विद्यार्थ्यांनी योगाची प्रात्यक्षिके केली.

यंदा " मानवतेसाठी योगा " ही संकल्पना होती. विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्रभारी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे, कर्नल प्रवीण धीमन, कर्नल पवनकुमार, चिफ रेक्टर प्रा. जे.बी.नाईक,क्रीडा विभागाचे संचालक डॉ.दिनेश पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.डॉ.लीना चौधरी व प्रा.डिंपल रडे यांनी योगा प्रोटोकॉल सादर केला. योगा मार्गदर्शन केंद्राचे प्रभारी प्रमुख इंजि.राजेश पाटील यांनी प्रास्ताविकात योगा दिनाचे महत्व सांगितले. अध्यक्षीय भाषणात प्रा.माहेश्वरी यांनी कोरोना नंतरच्या काळात योगाचे महत्व वाढीला लागले असून जीवनशैलीत बदल झाल्यामुळे आहार आणि विहारात फरक पडला आहे, अशा पार्श्वभूमीवर योगाचे महत्व अधिक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुभाष पवार यांनी केले. यावेळी राष्ट्रीय छात्रसेनेच्या १८ महाराष्ट्र बटालियन कॅम्पचे विद्यार्थी व विद्यार्थिनींसह ५०० कर्मचारी सहभागी झाले होते. विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी योगा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने योगा अवेअरनेस कार्यक्रमात सहभागी झालेल्यांना यावेळी पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

**रासेयो तर्फेही योगा दिन**

राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यापीठातील सामाजिकशास्त्र प्रशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने योगा दिन साजरा करण्यात आला. डॉ.दीपक सोनवणे यांनी योगा दिनाची माहिती दिली. डिंपल पवार यांनी विविध आसनाचे प्रकार शिकविले. यावेळी रासेयो संचालक डॉ.सचिन नांद्रे, विलास पाटील, अक्षय महाजन आदी उपस्थित होते.

---

## बातमी क्र.०२

जळगाव दि.२१ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्थेच्या ऑईल टेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ.जी.ए.उस्मानी व पेंट टेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ.रवींद्र पुरी यांची भारत सरकारच्या रेल्वे मंत्रालयाच्या संशोधन डिझाईन आणि मानक संस्थेच्या अनुक्रमे ऑईल व लुब्रीकंट आणि पेंटस् समितीमध्ये सद्स्य म्हणून निवड झाली आहे. संशोधन डिझाईन आणि मानक संस्था ही रेल्वे मंत्रालयातील प्रमाणित करणारी व संशोधन

आणि विकासातील महत्वाची समजली जाते. डॉ.उस्मानी व डॉ.पुरी यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

-------------------------------------------------------------------------------------------------

जा.क्र.कबचौउमवि/१६/युआयसीटी/हस्तदेय/२०२२ दि.२१ जून, २०२२

प्रति,

मा. संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त् बातमीस आपल्या जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयाच्या दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी